20.11.2025 प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - बाबा आले आहेत तुम्हा मुलांना शांती आणि सुखाचा वारसा देण्यासाठी, तुमचा स्वधर्मच शांती आहे, त्यामुळे तुम्ही शांतीसाठी भटकत नाही"

प्रश्नः- आता तुम्ही मुले २१ जन्मांसाठी अखुट खजिन्यांमध्ये तोलण्या योग्य बनता, ते कसे?

उत्तरः- कारण बाबा जेव्हा नवी सृष्टी रचतात, तेव्हा तुम्ही मुले त्यांची मदतगार बनता. आपले सर्व काही त्यांच्या कार्यामध्ये सफल करता म्हणून बाबा त्याच्या मोबदल्यात २१ जन्मांसाठी तुम्हाला अखुट खजिन्यांमध्ये असे तोलतात की कधी धन सुद्धा कमी होत नाही, दुःख येत नाही, अकाली मृत्यू सुद्धा होत नाही.

गीतः- मुझको सहारा देने वाले...

ओम् शांती. गोड-गोड रूहानी मुलांना 'ओम्'चा अर्थ तर सांगितला आहे. काहीजण फक्त ओम् म्हणतात, परंतु म्हटले पाहिजे - ओम् शांती. फक्त 'ओम्'चा अर्थ होतो - 'अहम् आत्मा'. 'ओम् शांती'चा अर्थ आहे - 'मी आत्मा शांत स्वरूप आहे'. मी आत्मा आहे, हे माझे शरीर आहे. आधी आहे आत्मा, नंतर आहे शरीर. आत्मा शांत स्वरूप आहे, तिचे निवास स्थान आहे - शांतीधाम. बाकी जंगलामध्ये गेल्याने काही खरी शांती मिळत नाही. खरी शांती तेव्हाच मिळणार आहे जेव्हा घरी जातो. दुसरे म्हणजे शांतीची अपेक्षा तिथे करतात जिथे अशांती असते. हे अशांतीचे दुःख धाम नष्ट होईल आणि मग शांती होईल. तुम्हा मुलांना शांतीचा वारसा मिळेल. तिथे ना घरामध्ये अशांती असणार, ना बाहेर राज्यामध्ये अशांती असते. त्याला म्हटले जाते शांतीचे राज्य, इथे आहे अशांतीचे राज्य कारण रावण राज्य आहे. ते आहे ईश्वराद्वारे स्थापन केलेले राज्य. मग द्वापर नंतर आसुरी राज्य असते, असुरांना कधी शांती मिळत नाही. घरी, दुकानामध्ये जिथे-तिथे अशांतीच अशांती असेल. ५ विकार रूपी रावण अशांती पसरवतात. रावण ही काय चीज आहे, हे कोणीही विद्वान, पंडित इत्यादी जाणत नाहीत. आपण वर्षानुवर्षे रावणाला का मारतो हेही त्यांना कळत नाही. सतयुग-त्रेतायुगामध्ये हा रावण असतच नाही. ते आहेच दैवी राज्य. ईश्वर बाबा दैवी राज्याची स्थापना तुमच्या द्वारे करतात. एकटेच तर करत नाहीत. तुम्ही गोड-गोड मुले ईश्वराचे मदतगार आहात. पूर्वी रावणाचे मदतगार होता. आता ईश्वर येऊन सर्वांची सद्गती करत आहेत. पवित्रता, सुख, शांतीची स्थापना करतात. तुम्हा मुलांना आता ज्ञानाचा तिसरा नेत्र मिळाला आहे. सतयुग-त्रेतामध्ये दुःखाची गोष्टच नाही. कोणी शिव्या इत्यादी देत नाहीत, घाणेरडे पदार्थ खात नाहीत. इथे तर बघा किती घाण खातात. दाखवतात श्रीकृष्णाला गायी फार प्रिय वाटत होत्या. असे नाही की श्रीकृष्ण कोणी गुराखी, गायींची राखण करत होता. नाही, तिथल्या गायी आणि इथल्या गायींमध्ये खूप-खूप फरक आहे. तिथल्या गायी सतोप्रधान, खूप सुंदर असतात. जशा सुंदर देवता, तशा गायी. बघूनच मन आनंदित होईल. तो आहेच स्वर्ग. हा आहे नरक. सर्वजण स्वर्गाची आठवण करतात. स्वर्ग आणि नरकामध्ये रात्र-दिवसाचा फरक आहे. रात्र असते अंधारी, दिवसा असतो उजेड. ब्रह्माचा दिवस म्हणजे ब्रह्मावंशींचा सुद्धा दिवस असतो. आधी तुम्ही देखील घोर अंधारामध्ये होता. यावेळी भक्तीचा किती प्रभाव आहे, महात्मा इत्यादींची सोन्यामध्ये तुला करतात कारण शास्त्रांचे खूप विद्वान-पंडित आहेत! त्यांचा प्रभाव इतका का बरं आहे? हे देखील बाबांनी समजावून सांगितले आहे. झाडातून नवीन-नवीन पाने निघतात तेव्हा सतोप्रधान असतात. वरून नवीन आत्मा आली तर जरूर तिचा प्रभाव अल्पकाळासाठी असेल ना. सोन्याने किंवा हिऱ्यांनी तुला करतात, परंतु हे सर्व खलास होणार आहे. लोकांकडे किती लाखोंची घरे आहेत. समजतात - आम्ही तर खूप श्रीमंत आहोत. तुम्ही मुले जाणता ही श्रीमंती थोड्या काळाकरिता उरली आहे. हे सर्व मातीत मिसळून जाईल. 'किनकी दबी रही धूल में...'. बाबा स्वर्गाची स्थापना करतात, यामध्ये जे देतात त्यांना २१ जन्मांसाठी हिरे-माणकांचे महाल मिळतील. इथे तर एका जन्मासाठी मिळते. तिथे तुमचे २१ जन्मांसाठी चालेल. या डोळ्यांनी जे काही बघता ते शरीरासहित सर्व भस्म होणार आहे. तुम्हा मुलांना दिव्य दृष्टी द्वारे साक्षात्कार सुद्धा होतो. विनाश होईल आणि मग या लक्ष्मी-नारायणाचे राज्य असेल. तुम्ही जाणता आम्ही आपले राज्य-भाग्य पुन्हा स्थापन करत आहोत. २१ पिढ्या राज्य केले मग रावणाचे राज्य चालले. आता पुन्हा बाबा आले आहेत. भक्तिमार्गामध्ये सर्वजण बाबांचीच आठवण करतात. गायन देखील

आहे - ‘दुःख में सिमरण सब करें…’ बाबा सुखाचा वारसा देतात, नंतर मग आठवण करण्याची आवश्यकता रहात नाही. ‘तुम माता-पिता…’ आता हे तर आई-बाबा असतील आपल्या मुलांचे. ही आहे पारलौकिक माता-पित्याची गोष्ट. आता तुम्ही हे लक्ष्मी-नारायण बनण्यासाठी शिकत आहात. शाळेमध्ये मुले चांगल्या मार्कांनी पास होतात तेव्हा मग टीचरला बक्षीस देतात. आता तुम्ही त्यांना काय बक्षीस देणार? तुम्ही तर त्यांना जादूने आपला बच्चा बनवता. असे दाखवतात की, श्रीकृष्णाच्या तोंडामध्ये आईने लोण्याचा गोळा बघितला. आता श्रीकृष्णाने तर जन्म घेतला सतयुगामध्ये. तो काही लोणी इत्यादी खाणार नाही. तो तर विश्वाचा मालक आहे. तर ही कधीची गोष्ट आहे? ही आहे आता संगम युगाची गोष्ट. तुम्ही जाणता आम्ही हे शरीर सोडून जाऊन बाळ बनणार. विश्वाचे मालक बनणार. दोन्ही ख्रिश्चन आपसात भांडतात आणि लोणी तुम्हा मुलांना मिळते. राज्य मिळते ना. जसे त्या लोकांनी भारतातील लोकांमध्ये आपसात भांडणे लावून लोणी स्वतः खाल्ले. ख्रिश्चनांचे राज्य पाऊण भागात होते. नंतर हळू-हळू कमी झाले आहे. साऱ्या विश्वावर तुमच्याशिवाय इतर कोणीही राज्य करू शकत नाही. तुम्ही आता ईश्वरीय संतान बनला आहात. आता तुम्ही ब्रह्मांडाचे मालक आणि विश्वाचे मालक बनत आहात. विश्वामध्ये ब्रह्मांड येत नाही. सूक्ष्मवतनमध्ये सुद्धा राज्य नसते. सतयुग-त्रेता… हे चक्र इथे स्थूल वतनमध्ये असते. ध्यानामध्ये आत्मा कुठे जात नाही. आत्मा निघून गेली तर शरीरच नष्ट होईल. हे सर्व आहेत साक्षात्कार, रिद्धी-सिद्धी द्वारा असे देखील साक्षात्कार होतात, ज्यामध्ये इथे बसून परदेशातील पार्लमेंट इत्यादी पाहू शकतात. आणि बाबांच्या हातामध्ये आहे दिव्य दृष्टीची चावी. तुम्ही इथे बसून लंडन पाहू शकता. अवजार इत्यादी काहीच नाही जे खरेदी करावे लागेल. ड्रामा अनुसार त्या वेळेला तो साक्षात्कार होतो, जो ड्रामामध्ये आधीपासूनच नोंदलेला आहे. जसे दाखवतात भगवंताने अर्जुनाला साक्षात्कार घडवला. ड्रामा नुसार त्याला साक्षात्कार व्हायचाच होता. याची देखील नोंद आहे. ही कोणाची स्तुती नाहीये. हे सर्व ड्रामा अनुसार होते. श्रीकृष्ण विश्वाचा प्रिन्स बनतो, जणू लोणी मिळते. हे देखील कोणी जाणत नाहीत की विश्व कशाला म्हटले जाते, ब्रह्मांड कशाला म्हटले जाते. ब्रह्मांडामध्ये तुम्ही आत्मे निवास करता. सूक्ष्मवतनमध्ये येणे-जाणे साक्षात्कार इत्यादी यावेळीच होते नंतर मग ५ हजार वर्षे सूक्ष्मवतनचे नावही नसते. म्हटले जाते - ब्रह्मा देवताय नमः मग म्हणतात शिव परमात्माए नमः तर सर्वात उच्च झाले ना. त्यांना म्हटले जाते भगवान. देवता सर्व आहेत मनुष्य, परंतु दैवी गुणवाले बाकी चार-आठ भुजावाले मनुष्य असत नाहीत. तिथे (स्वर्गामध्ये) देखील दोन भुजावालेच मनुष्य असतात, परंतु संपूर्ण पवित्र, अपवित्रतेची गोष्टच नसते. कधी अकाली मृत्यू होत नाही. तर तुम्हा मुलांना खूप आनंद झाला पाहिजे. आपण आत्म्यांनी या शरीराद्वारे बाबांना तर पाहूया. आपण शरीर तर पाहू शकतो, परमात्मा अथवा आत्म्याला काही पाहू शकत नाही. आत्मा आणि परमात्म्याला अनुभव करायचे असते. बघण्यासाठी मग दिव्य दृष्टी मिळते. दिव्य दृष्टीने बाकी सर्व वस्तू मोठ्या दिसून येतात. राजधानी मोठी दिसून येईल. आत्मा तर आहेच बिंदू. बिंदूला पाहून तुम्हाला काहीच समजणार नाही. आत्मा तर अतिसूक्ष्म आहे. पुष्कळ डॉक्टर्स इत्यादींनी आत्म्याला शोधून काढण्याचा खूप प्रयत्न केला आहे, परंतु कोणीही शोधू शकले नाही. ते लोक तर सोन्या-हिऱ्यांमध्ये तुला करतात. तुम्ही जन्म-जन्मांतर पदमपती बनता. तुमचा बाह्य शो जरा देखील नाहीये. साधारण रीतीने या रथामध्ये बसून शिकवतात. त्यांचे नाव आहे - भागीरथ. हा आहे पतित जुना रथ, ज्यामध्ये बाबा येऊन सर्वश्रेष्ठ सेवा करतात. बाबा म्हणतात - मला तर आपले शरीर नाही आहे. मी जो ज्ञानाचा सागर, प्रेमाचा सागर… आहे, तर तुम्हाला वारसा कसा देऊ! वरून तर देणार नाही. प्रेरणेने शिकवेन काय? जरूर यावे लागेल ना. भक्तिमार्गामध्ये माझी पूजा करतात, सर्वांना प्रिय वाटतो. गांधीजींचे, नेहरुंचे चित्र सर्वांना आवडते ना, त्यांच्या शरीराची आठवण करतात. आत्मा जी अविनाशी आहे तिने तर जाऊन दुसरा जन्म घेतला. बाकी विनाशी चित्राची आठवण करतात. ती भूत पूजा झाली ना. समाधी बनवून त्याच्यावर फुले इत्यादी वाहत बसतात. हे आहे यादगार. शिवाची किती मंदिरे आहेत, सर्वात मोठे यादगार शिवाचे आहे ना. सोमनाथ मंदिराचे गायन आहे. मोहम्मद गजनवीने येऊन लुटले होते. तुमच्याकडे इतके धन होते. बाबा तुम्हा मुलांना रत्नांमध्ये तोलतात. स्वतःची तुला करत नाहीत. मी इतका धनवान बनत नाही, तुम्हाला बनवतो. त्यांची (दुनियेतील महान व्यक्तींची) तर आज तुला केली आणि उद्या मरून गेले. धन काही कामी येणार नाही. तुमची तर बाबा अखुट खजिन्याने अशी तुला करतात जी २१ जन्म सोबत राहील. जर श्रीमतावर चालाल तर तिथे दुःखाचे नाव नसेल, कधी अकाली मृत्यू होत नाही. तुम्ही मृत्यूला घाबरणार नाही. इथे किती घाबरतात, रडतात. तिथे किती आनंद होतो - जाऊन प्रिन्स बनणार. जादूगार, सौदागर, रत्नाकर हे शिव परमात्म्याला म्हटले जाते. तुम्हाला देखील साक्षात्कार घडवतात. असे प्रिन्स बनणार. आजकाल बाबांनी साक्षात्काराचा पार्ट बंद केला आहे. नुकसान होते. आता बाबा ज्ञानाद्वारे तुमची सद्गती करतात. तुम्ही अगोदर जाल सुखधाम मध्ये. आता तर आहे दुःखधाम.

तुम्ही जाणता आत्माच ज्ञान धारण करते. म्हणून बाबा म्हणतात - स्वतःला आत्मा समजा. आत्म्यामध्येच चांगले अथवा वाईट संस्कार असतात. शरीरामध्ये असते तर शरीरासोबत संस्कार देखील भस्म होतील. तुम्ही म्हणता - शिवबाबा, आम्ही आत्मे शिकत आहोत या शरीराद्वारे. नवीन गोष्ट आहे ना. आम्हा आत्म्यांना शिवबाबा शिकवत आहेत. हे तर पक्के-पक्के लक्षात ठेवा. आम्हा सर्व आत्म्यांचे ते पिता देखील आहेत, टीचर देखील आहेत. बाबा स्वतः म्हणतात - मला माझे शरीर नाही आहे. मी देखील आहे तर आत्मा, परंतु मला 'परमात्मा' म्हटले जाते. आत्माच सर्व काही करते. बाकी शरीराची नावे बदलतात. आत्मा तर आत्माच आहे. मी परम-आत्मा तुमच्याप्रमाणे पुनर्जन्म घेत नाही. माझा ड्रामामध्ये पार्टच असा आहे, जो मी यांच्यामध्ये प्रवेश करून तुम्हाला ऐकवत आहे; म्हणून यांना भाग्यशाली रथ म्हटले जाते. यांना 'पुरानी जुत्ती' असे देखील म्हणतात. शिवबाबांनी देखील जुना मोठा बूट घातला आहे. बाबा म्हणतात - मी यांच्यामध्ये अनेक जन्मांच्या अंतामध्ये प्रवेश केला आहे. सर्वप्रथम हे बनतात तत् त्वम. बाबा (ब्रह्मा बाबा) म्हणतात - 'तुम्ही तरुण आहात. माझ्यापेक्षाही जास्त चांगले शिकून उच्चपद प्राप्त केले पाहिजे, परंतु माझ्यासोबत बाबा आहेत त्यामुळे मला घडोघडी त्यांची आठवण येते. बाबा माझ्यासोबत झोपतात देखील, परंतु बाबा मला मिठी मारू शकत नाहीत. तुम्हाला मिठी मारू शकतात. तुम्ही भाग्यशाली आहात ना. शिवबाबांनी जे शरीर लोनमध्ये घेतले आहे तुम्ही त्याला मिठी मारू शकता. मी कशी मारू! माझ्या तर हेही नशिबात नाहीये म्हणून तुम्ही लक्की सितारे (भाग्यवान तारे) गायले गेले आहात. मुले नेहमी भाग्यवान असतात. वडील पैसे नेहमी मुलांना देतात, तर तुम्ही भाग्यवान तारे झालात ना. शिवबाबा देखील म्हणतात - तुम्ही माझ्यापेक्षाही लक्की आहात, तुम्हाला शिकवून विश्वाचा मालक बनवतो, मी थोडाच बनतो. तुम्ही ब्रह्मांडाचे देखील मालक बनता. बाकी माझ्याकडे जास्त दिव्य दृष्टीची चावी आहे. मी ज्ञानाचा सागर आहे. तुम्हाला देखील मास्टर ज्ञानसागर बनवतो. तुम्ही या साऱ्या चक्राला जाणून चक्रवर्ती महाराजा-महाराणी बनता. मी थोडेच बनतो. जेव्हा वृद्ध होतात तेव्हा मग मुलांना विल करून आपण वानप्रस्थमध्ये निघून जातात. पूर्वी असे घडत होते. आजकाल तर मुलांमध्ये आसक्ती निर्माण होते. पारलौकिक बाबा म्हणतात - मी यांच्यामध्ये प्रवेश करून तुम्हा मुलांना काट्यापासून फूल विश्वाचा मालक बनवून, अर्ध्या कल्पासाठी कायमचे सुखी बनवून मी वानप्रस्थमध्ये जाऊन बसतो. या सर्व गोष्टी शास्त्रांमध्ये थोड्याच आहेत. संन्यासी, उदासी शास्त्रांच्या गोष्टी ऐकवतात. बाबा तर ज्ञानाचा सागर आहेत. स्वतः म्हणतात ही वेद-शास्त्रे इत्यादी सर्व भक्तिमार्गाची सामग्री आहे. ज्ञानसागर तर मीच आहे. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

१) या डोळ्यांनी शरीरासहित जे काही दिसते, ते सर्व भस्म होणार आहे म्हणून आपले सर्व काही सफल करायचे आहे.

२) बाबांकडून पूर्ण वारसा घेण्यासाठी चांगला अभ्यास करायचा आहे. सदैव आपल्या नशिबाला स्मृतीमध्ये ठेवून ब्रह्मांडाचा अथवा विश्वाचा मालक बनायचे आहे.

वरदान:- 'वाह ड्रामा वाह'च्या स्मृतीद्वारे अनेकांची सेवा करणारे सदा खुशनुमा भव

या ड्रामातील कोणतेही दृश्य बघत असताना 'वाह ड्रामा वाह'ची स्मृती राहिली तर तुम्ही कधीही घाबरणार नाही, कारण ड्रामाचे ज्ञान मिळाले आहे की, वर्तमान समय कल्याणकारी युग आहे; यामध्ये जे काही दृश्य समोर येते, त्यामध्ये कल्याण सामावलेले आहे. भले आता यावेळी जरी कल्याण दिसत नसेलही परंतु भविष्यामध्ये दडलेले कल्याण प्रत्यक्ष होईल तेव्हा 'वाह ड्रामा वाह' या स्मृतीने सदा खुशनुमा रहाल (प्रफुल्लित रहाल), पुरुषार्थामध्ये कधीही उदासीनता येणार नाही. तुमच्याद्वारे आपोआपच अनेकांची सेवा होत राहील.

बोधवाक्य:- शांतीची शक्तीच मन्सा सेवेचे सहज सोपे साधन आहे. जिथे शांतीची शक्ती असते तिथे संतुष्टता असते.

||| ओम शांती |||

अव्यक्त इशारे:- अशरीरी आणि विदेही स्थितीचा अभ्यास वाढवा. जितके अव्यक्त लाईट रूपामध्ये स्थित व्हाल, तितके शरीरापासून वेगळे रहाण्याचा अभ्यास असल्याकरणाने दोन-चार मिनिटे जरी अशरिरी बनलात, तरी जणू काही चार तासांची विश्रांती घेतली असे समजाल. अशी वेळ येईल की झोपे ऐवजी चार-पाच मिनिटे अशरिरी बनाल आणि शरीराला विश्रांती मिळेल. लाईट (हलक्या) स्वरूपाच्या स्मृतीला मजबूत केल्याने हिशोब चुकता करण्यामध्ये देखील लाईट रूप व्हाल (हलकेपणा अनुभव कराल).